अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. १३ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १९४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ४०.२

किमान तपमान २५.५

### दुचाकी घसरून जखमी; तरुणाचा मृत्यू

✔ सोलापूर : मंगळवेढा जवळ दुचाकी घसरून जखमी झालेले राजअहमद हाजीमलंग शेख (वय ३७ रा.मड्डीवस्ती सोलापूर) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी पहाटे मयत झाला. तो शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास सोलापूर येथून पाटकुल (मंगळवेढा) असा दुचाकीवरून प्रवास करीत होते. मंगळवेढा जवळ दुचाकी घसरल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्यास मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून म्बुलन्स मधून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान शनिवारी पहाटे तो मयत झाला. याची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# हतीद-सांगोल्याला नवऱ्याचा सख्खा मामाच निघाला ‘वासनांध’

# लफड्याच्या छळवादाला कंटाळून श्रावणीने संपविले अखेर जीवन

## अवघ्या सहा महिन्याच्या अनुश्रीला सोडून तिनं केली आत्महत्या

## सांगोला तालुक्यातील हतीदमधील हृदयद्रावक घटना

## हतीदसह तालुक्यात हळहळ

## नवरा, आजी, दोघे मामा असे घरातल्या सगळ्यांना जेलची हवा

✔ सांगोला- सोलापूर/खास प्रतिनिधी

**सांगोला तालुक्यातील हतीद येथे दोनच वर्षापूर्वी लग्न झालेल्या आणि अवघी सहा महिन्याची मुलगी असलेल्या श्रावणी अनिकेत मंडल (वय २३) या विवाहितेने विष पिऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. नवरा अनिकेत याचा सख्खा मामा नेताजी चव्हाण हा शरिराशी लगट करायचा, छेडछाड करायचा, शरीर संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकायचा, त्याचबरोबरच नवऱ्यासह घरातील आज्जेसासू आंबुताई चव्हाण, नवऱ्याचा दुसरा मामा सोमा चव्हाण यांच्याकडून शिवीगाळ, मारहाण असा छळवाद सुरु होता. त्यास कंटाळून श्रावणी हिने विषारी द्रव प्राशन करुन आत्महत्या केली.**



### चिमुरडी अनुश्री झाली पोरकी

मृत श्रावणी हिला सहा महिन्याची अनुश्री मुलगी आहे. ती अजून श्रावणीचं दूध पित होती. तिला अजून आई-वडिलांचीसुद्धा चांगली ओळख व्हायची होती, तोपर्यंतच होणाऱ्या असह्य छळाला कंटाळून श्रावणी हिनं आत्महत्या केली. ती या जगाला कायमचं सोडून जाताना सहा महिन्याच्या पोटच्या गोळाल्यासुद्धा सोडून गेली. सहा महिन्याची चिमुरडी अनुश्री आईविना कायमची पोरकी झाली. याबद्दल हतीद परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान याप्रकरणी विवाहित श्रावणी हिची आई मनिषा चव्हाण (वय ४० रा.मणेराजुरी ता. तासगाव जि. सांगली) यांनी सांगोला पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून श्रावणी हिच्या आत्महत्येशी जबाबदार असल्याच्या कारणावरुन पती अनिकेत मंडले, आज्जेसासू आंबुताई चव्हाण, नवऱ्याचे मामा सोमा चव्हाण आणि नेताजी चव्हाण यांना पोलिसांनी अटक केली आहे.

सांगोला तालुक्यातील हतीद येथील अनिकेत याच्यासोबत श्रावणी हिचा विवाह जून २०२३ मध्ये झाला होता. दोन-तीन महिने तिला चांगले नांदविल्यानंतर तिचा घरातील सगळ्या सदस्यांनी मानसिक, शारिरीक छळ सुरु केला. शिवाय नवऱ्याचा मामा नेताजी चव्हाण हा श्रावणी हिला शारिरीक संबंध ठेव म्हणून छेडछाड करीत होता, लगट करीत होता, असे मृत श्रावणी हिची आई मनिषा चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर, सगळ्याचा संशयितांना अटक करण्यात आली असून सांगोला पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुजारी हे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.



**सांगोला : आठवणीचे क्षण म्हणून श्रावणी मंडले हिने जिवंतपणी मोठ्या हौसेने चिमुरडी लेकीला घेऊन असा सुंदर फोटो काढला होता. हा फोटो केवळ आता आठवण म्हणूनच राहिला.**

### अवघ्या दोनच वर्षात संपला संसार...

मृत श्रावणी हिचा अनिकेत मंडले याच्यासोबत जून २०२३ मध्ये विवाह झाल्या होता. तद्नंतर दोन वर्षातच होणाऱ्या छळवादातून श्रावणीला या जगाचा कायमचा निरोप घ्यावा लागला. अनिकेत हाच पती म्हणून जन्मोजन्मी सात जन्मी राहावा अशी मनिषा श्रावणी हिनं आपल्या मनाशी लग्नानंतर काही सुखाच्या दिवसात बाळगली होती. मात्र, पुढे तिचा छळवाद सुरु झाला. अवघे दोन वर्षे तिने कसाबसा संसार केला.‘भातकुलीच्या खेळामधली राजा अन् एक राणी...अर्ध्यावरती डाव मोडिला अधूरी एक कहाणी’ या गाण्याचा प्रत्यय श्रावणीच्या आत्महत्येमधून आला.

### श्रावणीचा सोन्याचा संसार अवघ्या तीन महिन्यांचा

चांगला संसार करायचा अशी मनीषा बाळगून असलेल्या श्रावणीला तिच्या सासरच्यांनी अवघे तीन महिने चांगले वागवले. मात्र तद्नंतर तिचा कायम छळवाद केला. सोन्यासारखा संसार तिच्या नशिबी अवघा तीन महिने राहिला.

### भांडणात जखमी झालेल्या इसमाचा मृत्यू

✔ सोलापूर : लहान मुलाच्या भांडणातून लाकडाने केलेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या सापजाई (ता.कळंब) येथील ३८ वर्षीय इसमाचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी रात्री मृत्यू झाला.

कैलास अंकुश पायाळ (वय ३८ रा. सापजाई ता.कळंब जि.धाराशिव) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. शुक्रवारी (४ एप्रिल ) रोजी सायंकाळच्या सुमारास त्यांच्या घराजवळ लहान मुलांच्या कारणावरून सूरज वाघमारे (रा.येरमाळा) याने लाकडाने बेदम मारहाण केली होती. त्यात डोके आणि तोंडात मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना धाराशिव येथे प्राथमिक उपचार करून ५ एप्रिल रोजी सोलापुरात धम्मपाल पायाळ (पुतण्या) यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान ते शुक्रवारी रात्री मयत झाले. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकित झाली आहे

## अमृत भारत स्टेशन योजना

# सोलापूर, पंढरपूरससह १३२ रेल्वे स्थानकांचा होणार कायापालट

✔ मुंबई/प्रतिनिधी

भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सोलापूरसह पंढरपूर रेल्वे स्टेशनचाही समावेश आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे. या योजनेंतर्गत सोलापूर स्टेशनच्या विकासासाठी तब्बल ५६ ५६ कोटी निधी मिळाला आहे. पंढरपूर रेल्वेस्टेशनसाठी ४० कोटी तर धाराशिव रेल्वे स्टेशनसाठी २२ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

### काही महत्त्वाची स्थानके

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्चिम), अंधेरी, टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली, अमरावती, भुसावळ, इत्यादी. तसेच, उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान देण्यात आले आहे.

## नोंदणी दस्तात परस्पर बदल

# तब्बल पाच कोटींना घातली टोपी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

नोंदणी दस्तामध्ये परस्पर बदल करुन त्याचे बनावटीकरण करुन पुण्याच्या ठकसेनांनी जवळपास ५ कोटी रूपयांची फसवणूक केली आहे. हा प्रकार सोलापूरच्या दुय्यम निबंधक उत्तर-२ च्या कार्यालयात १६ मार्च रोजी घडला.





फसवणूक झालेल्या अनुक्रमे रघुनाथ आनंदा रोकडे, संदीप गोविंद रोकडे यांच्या फिर्यादीनुसार राहुल लाड आणि राजेंद्र थोरवे या आरोपींविरूध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निगडी प्राधिकरण सेक्टर २ सोलापूर यांचे कार्यालय येथील रहिवासी रघुनाथ रोकडे (वय-४५ वर्षे) आणि सांगली जिल्ह्यातील बहे वळवा येथील संदीप रोकडे (वय-४५ वर्षे) यांनी दुय्यम निबंधक उत्तर-२ कार्यालयात १६ मार्च रोजी नोंदणी खरेदी दस्त क्र. २१३७/२०२५ आणि नोंदणी खरेदी दस्त क्र. २१३८/२०२५ नुसार केले होते. दोन्ही दस्तामधील पान क्र. ७ मध्ये परस्पर बदल करुन बनावट मजकूर समाविष्ट करुन त्या दस्ताचे राहुल विष्णु लाड (रा. वाल्हेरवाडी, चिंचवड, पुणे) आणि राजेंद्र तुकाराम थोरवे, (रा. गणेश नगर, थेरगाव, पुणे) यांनी बनावटीकरण केले. त्या आडून रघुनाथ रोकडे यांची २ कोटी ५ लाख रुपये तर संदीप रोकडे यांची २ कोटी ९३ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी सदर बझार पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास सपोनि पाटील करीत आहेत.

### विष प्यायलेल्या तरुणाचा मृत्यू

✔ सोलापूर : दारूच्या नशेत एका २६ वर्षीय तरुणाने स्वतःच्या शेतात विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना वागदरी (ता. अक्कलकोट) येथे घडली.

जगदीश शिवशरण यमाजी (वय २६ रा. वागदरी ता.अक्कलकोट) असे मयताचे नाव आहे. त्याने गुरुवार दि.१० एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास स्वतःच्या शेतात नशेत विषारी द्रव प्राशन केले होते. त्याला मीनाक्षी (आई ) यांनी त्याला सायंकाळी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. तो शनिवारी पहाटे मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### घरगुती वादातून इसमाची आत्महत्या

✔ सोलापूर : घरगुती वादातून एका ४० वर्षीय इसमाने विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना पापरी (ता .मोहोळ) येथे घडली. शंकर रघुनाथ जाडकर (वय ४० रा.पापरी ता.मोहोळ) असे मयताचे नाव आहे.

त्यांनी गुरुवारी दुपारच्या सुमारास राहत्या घरात घरगुती वादातून विषारी द्रव प्राशन केले होते. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून बापू (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.उपचारादरम्यान ते शनिवारी दुपारी मयत झाले. याची नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**अन्न, वस्त्र, निवारा एवढेच व्हाट्सअप पण गरजेचे झाले आहे !**

| संगम श्री डे |
|---|
| 160-77-179 |

| कल्याण |
|---|
| 469-93-689 |

# एसटीवरून राष्ट्रवादी आणि शिंदे गटात खडाजंगी

## उपमुख्यमंत्री शिंदे यांची थेट अमित शहांकडे धाव

✔ मुंबई/प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराज असणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शांत करण्यात यश मिळवले असले तरी शिंदे यांची अशांती पुन्हा बाहेर पडली आहे. राज्य परिवहन (एसटी) महामंडळ कर्मचाऱ्यांच्या पगार कपातीवरून म हायुतीच्या मंत्र्यांमधील वाद पुन्हा उफाळून आला.शिंदे गट आणि अजितदादा पवार यांच्यात एसटीच्या प्रश्नावरून जोरदार खडाजंगी झाल्याने सरकारमध्ये शांती बिलकूल दिसत नाही.

एसटी विभागाच्या वेतन आणि इतर फाईल अडकवून ठेवल्या जातात. खात्याच्या फाईल अर्थमंत्र्यांकडे पाठवल्या जात नाहीत’, असा खळबळजनक आरोप करत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. त्यावर, ‘एसटीला आम्ही वेळोवेळी मदत करतो’, अशा शब्दात अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिले. दरम्यान, परिवहनमंत्रीच थेट अर्थ सचिवांकडे निधीसाठी गेल्यानंतर शुक्रवारीच राज्य सरकारने १२० कोटींचा निधी मंजूर केला.‘कर्मचाऱ्यांच्या पगाराचा निर्णय लवकर होणे गरजेचे आहे. कारण सरकारी कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळते तर मग एसटी कर्मचाऱ्यांना का नाही? वेतन वेळेवर मिळावे ही अर्थ खात्याची जबाबदारी आहे. आम्ही अर्थ खात्याकडे भीक मागत नाही. आमचा अधिकार मागत आहोत. परिवहन विभागाची फाइल परस्पर आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांकडे परत पाठवली जाते. अर्थ खात्याच्या मंत्र्यांकडेही ती जात नाही ही खरी शोकांतिका आहे’, असा थेट आरोप सरनाईक यांनी अजित पवार यांच्या खात्याावर केला.‘कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या वेतन प्रश्नासाठी राजशिष्टाचाराला बगल देत मंत्रालयात अर्थ सचिवांच्या दालनात बैठक घेण्यात आली. एसटी महामंडळाचे विविध सवलतीपोटी शासनाकडे थकीत असलेले १,०७६ कोटी रुपये तातडीने द्यावेत, अशी आग्रही मागणी या बैठकीत अर्थ सचिव सौरभ विजय यांच्याकडे करण्यात आली. शिंदे यांनी वेतनाच्या प्रश्नावर अर्थ विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी .गुप्ता यांना संपर्क साधून एसटी कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या वेतनासाठी १२० कोटी रुपये तातडीने देण्याची निर्देश दिले. त्यानुसार शुक्रवारी झालेल्या बैठकीत अर्थ सचिव सौरभ विजय यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद देत कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनासाठी तातडीने १२० कोटी रुपये देण्याचे मान्य केले. त्यानुसार शासन निर्णयही काढण्यात आला. त्यामुळे येत्या मंगळवारी कर्मचाऱ्यांना उर्वरित वेतन अदा होईल’, अशी माहिती सरनाईक यांनी दिली. तसेच उरलेले ९४६ कोटी रुपये तीन टप्प्यांमध्ये महामंडळाला देण्याचेही यावेळी अर्थ सचिवांनी मान्य केल्याचे त्यांनी सांगितले.





### थेट अमित शहांकडे तक्रार

पुणे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे अर्थ खात्याची तक्रार केल्याचा अंदाज वर्तवला जातोय. अमित शाह हे महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेना मंत्र्यांच्या फायली या अर्थखात्याकडून लवकर मंजूर होत नसल्याचा वाद आता अमित शाह यांच्यापर्यंत पोहोचला आहे. आपल्या आमदार आणि मंत्र्यांच्या फायली या क्लिअर होत नसल्याची तक्रार एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे केल्याची माहिती आहे.शाह आणि शिंदे यांच्यात शुक्रवारी रात्री पुण्यात बैठक पार पडल्याची माहिती आहे. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी अर्थखात्याबाबत तक्रार केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या बैठकीचा रोख हा अजित पवार यांच्या अर्थमंत्रालयाकडे असल्याची माहिती आहे. शिंदे यांनी रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा वाद सोडवण्याचीदेखील मागणी अमित शाह यांच्याकडे केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.